राष्ट्रीय चर्चासत्र



आ. य. पवार यांच्या

# निसर्ग व विज्ञान कविता




संपादक

प्रा. डॉ. जयदेवी पवार

सहसंपादक

प्रा. डॉ. दुष्यंत कटारे

# आ. य. पवार यांच्या
# निसर्ग व विज्ञानकविता

राष्ट्रीय चर्चासत्रातील मान्यवर शोधनिबंध वाचक
आणि सर्व शोधनिबध लेखकांना समर्पित

# आ. य. पवार यांच्या निसर्ग व विज्ञानकविता


| | | |
|---|---|---|
| प्रकाशन | : | इन्व्हेंशन पब्लिकेशन,<br>INVENTION PUBLICTION<br>व्यवस्थापक - शरद जाधव<br>महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स,<br>गांधी चौक, लातूर - ४१३ ५१२ |
| संपादक | : | प्रा. डॉ. जयदेवी पवार |
| सहसंपादक | : | प्रा. डॉ. दुष्यंत कटारे |
| प्रथम आवृत्ती | : | |
| ISBN | : | 978-81-931335-1-4 |
| मुद्रक | : | इंडो एन्टरप्रायजेस प्रा.लि., लातूर<br>बी-४४, एम. आय. डी. सी., लातूर |
| अक्षर जुळणी | : | मनोज कुलकर्णी |
| मुद्रितशोधन | : | शरद खर्चे |
| मुखपृष्ठ | : | प्रशांत गोणे |
| किंमत | : | रु. ४२५/- |

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आणि

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव, ता. जि. लातूर

मराठी विभागाच्या वतीने बालकवि स्मृतिदिनानिमित्त आयोजित चर्चासत्र

## नव्वदोत्तरी मराठी कवितेतील आ. य. पवार यांच्या निसर्ग व विज्ञानकविता

गुरुवार, दि. ०५ मे २०२२

# ऋणनिर्देश

**मा.आ.श्री. धिरज विलासराव देशमुख** : अध्यक्ष, दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव

**डॉ. केशव सखाराम देशमुख** : मराठी विभागप्रमुख, स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**डॉ. प्रमोद पडवळ** : (वाराणसी) चर्चासत्राचे उद्घाटक

**डॉ. मोना चिमोटे** : (अमरावती) चर्चासत्राच्या बीजभाषक

**डॉ. राम वाघ** : (लातूर) चर्चासत्र उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष

**डॉ. चिन्मय घैसास** : (गोवा) अध्यक्ष, चर्चासत्र विज्ञानकविता

**श्री. श्याम देशमुख** : (लातूर) सचिव, दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व संचालक मंडळ व राष्ट्रीय चर्चासत्रातील मान्यवर शोधनिबंध वाचक आणि सर्व शोधनिबंध लेखक

# संपादकीय

उत्क्रांतीचा इतिहास अभ्यासल्यास मानवी समाज कायम परिवर्तनशील असल्याचे दिसून येते. काळाबरोबर समाजरचनेत घडणाऱ्या चांगल्या-वाईट बदलांचे यथार्थ दर्शन त्या-त्या प्रादेशिक साहित्यातून आढळते. साहित्याच्या आधारेच अनेक वेळा त्या समाजाच्या इतिहासाचे संशोधन व लेखन झाल्याची उदाहरणे आहेत म्हणून काळाच्या कसोटीवर उतरविणारे साहित्य त्या समाजाची सौंदर्यनिर्मिती ठरलेली आहे.

समाज बदलाबरोबर साहित्यातही बदल होतो नि जुनी मूल्ये जाऊन तेथे नवीन मूल्ये प्रस्थापित होतात. या प्रक्रियेलाच सामाजिक बदलाचा कालखंड म्हणतात. मराठी साहित्यात असे प्राचीन, मध्ययुगीन अर्वाचीन, साठोत्तरी, नव्वदोत्तरी असे कालखंड दिलेले आहेत.

१९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शैक्षणिक औद्योगिक विकासाला चालना मिळाल्या. भारत सरकारने विज्ञान-तंत्रज्ञानावर मोठा भर दिला. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या विकासाचा फायदा भारतीय जनतेला मिळावा म्हणून १९५८ मध्ये लोकसभेने विज्ञान धोरणाचा संकल्प मंजूर केला. विज्ञानाच्या विविध शाखा व संस्था ही आधुनिक भारताची मंदिरे बनली. विज्ञानाच्या कृपेतूनच जागतिक स्पर्धेत देशाने आगेकूच केली. प्रगत व बलाढ्य देशाच्या स्पर्धेत भारतीय अवकाशयाने अंतराळात झेपावली. बाह्य देशांकडून अन्नधान्य आयात करणारा भारत विज्ञान-तंत्रज्ञानाच्या मदतीने हरित क्रांती, धवल क्रांती, सुवर्ण क्रांती घडवून स्वबळावर प्रगत झाला आणि या वर्षी (२०१८) भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करीत आहे.

देशाचे वैज्ञानिक धोरण व अमृतमहोत्सवी वर्षाचा विचार करता आमच्या महाविद्यालयाने विज्ञान साहित्यावर राष्ट्रीय चर्चासत्र घेण्याचे निश्चित केले. साठोत्तरी मराठी कालखंडात ग्रामीण, दलित, अदिवासी, जनवादी साहित्याचे प्रवाह परिपुष्ट झाले. याच काळात काही लेखकांनी विज्ञान साहित्याचा नवीन झरा वाहता केला पण विज्ञान कवितेची उपेक्षाच झाली. कुसुमाग्रज, वि. दा. करंदीकर, बा. सी. मर्ढेकर अशा काही कवींचा अपवाद वगळता विज्ञान कवितेचा ताटवा बहरलाच नाही. पाश्चात्त्य देशांत या दरम्यान विज्ञान कथा-कादंबरीबरोबर कविताही विपुल प्रमाणात लिहिली गेली परंतु मराठीत आज विज्ञान कथा-कादंबऱ्यांचा प्रांत वाढीस लागताना वाङ्.मयीन गुणवत्तेची विज्ञानकविता कासवगतीनेही पुढे सरकलीच नाही. या अवस्थेत

काही समीक्षक विज्ञान कवितेची बाल्यावस्था म्हणतात तर काही समीक्षक विज्ञानकविता वयात आलीच नाही असे म्हणतात. अभ्यासकांचे विचार काहीही असले तरी साठोत्तरी मराठीत विज्ञान कथा-कादंबरीप्रमाणे विज्ञान कवितेचा ताटवा फुललाच नाही हे निश्चित. काव्य लिहिताना कवितेचा आधार कल्पना व भान असते नि विज्ञानात तर भावनेला थारा नसतो;

शिवाय कविता स्फुरित असावी लागते कदाचित या कारणामुळे विज्ञानकवितेकडे कवींनी पाठ फिरविली असावी.

थोर शास्त्रज्ञ व विज्ञान लेखक डॉ. जयंत नारळीकर डिसेंबर २०२० मध्ये नासिक येथील ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. मराठी भाषेच्या अभ्यासात विज्ञान साहित्याची उपेक्षा होत असल्याची खंत व्यक्त करून या साहित्याला ऊर्जितावस्था प्राप्त करून देणे गरजेचे आहे असे ते म्हणाले. वरील सर्व बाबींचा विचार करून विज्ञान साहित्यातील काव्याच्या उपेक्षित घटकांवर राष्ट्रीय चर्चासत्र घेतल्यास विज्ञान कवितेसंदर्भात जाणीवजागृती होऊन हा प्रवाह गतिमान होण्यास मदत होईल. एकविसावे शतक हे विज्ञान - तंत्रज्ञानाचे युग असल्याचे याचे प्रतिबिंब मराठी साहित्यात पडू शकते. इंग्रजी भाषा विज्ञान साहित्याने परिपुष्ट असताना जागतिकीकरणाच्या धोरणात व जागतिक भाषा भगिनींच्या स्पर्धेत विज्ञान साहित्याशिवाय मराठी भाषा सशक्त होऊच शकत नाही हे वर्म ओळखून विज्ञानकवितेवर राष्ट्रीय चर्चासत्र घेण्यावर आमच्या महाविद्यालयाचा मराठी विभाग ठाम राहिला.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या मराठी पदवी द्वितीय वर्षात कवी आ. य. पवार यांची 'विज्ञान वंदना' कविता अभ्यासक्रमात आहे. त्या कवितेच्या मागोव्यातून पवारांच्या विज्ञान कवितांची जोखीम केली. वाङ्.मयीन गुणवत्तेच्या त्यांच्या पुष्कळ विज्ञानकविता दिसून आल्या. मान्यवर अभ्यासकांनी त्यांच्या विज्ञानकवितांची संपादन केलेले असून त्यांच्या कवितेवर तीन समीक्षा ग्रंथ प्रसिध्द झालेले आहेत. दोन अभ्यासकांनी त्यांच्या 'ऊनपाऊस' आणि 'सीनाकाठच्या कविता' या काव्यसंग्रहावर एम. फिल पदव्या घेतल्या आहेत. मुंबई विद्यापीठ विभागातील पेंढारी येथील महाविद्यालयाने पवारांच्या विज्ञानकवितेवर राज्य स्तरीय चर्चासत्र घेतले आहे. त्यांच्या कविता नांदेड, नागपूर, अमरावती विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात असून 'धूळपेर' काव्यसंग्रह कर्नाटक विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमात आहे. एकंदरीत या सर्व बाबींचा विचार करून 'आ. य. पवार यांची निसर्ग व विज्ञानकविता' या नावे कोरोनामुळे राष्ट्रीय आभासी चर्चासत्र बालकवींच्या स्मृतिदिनी (५ मे २०२२) आम्ही आयोजित केले. उद्घाटन समारंभ, निसर्गकविता, विज्ञानकविता अशा तीन सत्रांत अभ्यासपूर्ण नवविचार चर्चेने चर्चासत्र उत्साहात संपन्न झाले. मान्यवर अभ्यासक, लेखकांकडून भरभरून प्रतिसाद मिळाल्याने नियोजित वेळेपेक्षा दोन तास अधिक वेळ वाढवून देण्यात आला. बहुसंख्य साहित्य रसिकांनी व अभ्यासकांनी चर्चासत्राचा लाभ घेतला.

नव्वदोत्तरी मराठी काव्यप्रवाहातील नावीन्यपूर्ण विषयावरील या राष्ट्रीय चर्चासत्राने मराठी काव्य प्रांतात वेगळी मोहर उठविली असून आमच्या महाविद्यालयाने मराठी शारदेच्या मंदिरात प्रयोगशील विज्ञान व निसर्गकवितेचा नवतेजाचा दीप प्रज्वलित केल्याचे समाधान आम्हास निश्चित आहे. आ. य. पवारांची कविता ही सोनचाफ्याप्रमाणे दीर्घ काळ काळावर अधिराज्य करणारी आहे असे मला वाटते.

कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर दूरदृश्यप्रणालीद्वारे घेण्यात आलेल्या या आभासी राष्ट्रीय चर्चासत्रात १०० पेक्षा अधिक संशोधक, अभ्यासक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि साहित्य रसिक सहभागी झाले होते. उत्तर प्रदेशातील वाराणसीच्या काशी हिंदू विश्वविद्यालयातील डॉ. प्रमोद पडवळ यांनी या चर्चासत्राचे उद्घाटन केले तर अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठाच्या डॉ. मोना चिमोटे यांनी बीजभाषण दिले. दोन सत्रांत झालेल्या या चर्चासत्रातील निसर्गकवितांच्या अनुषंगाने पहिल्या चर्चासत्राचे अध्यक्षस्थान स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. पृथ्वीराज तौर यांनी अध्यक्षस्थान भूषविले तर विज्ञानकवितावर आधारित दुसऱ्या चर्चासत्राचे अध्यक्षस्थान गोवा विद्यापीठातील डॉ. चिन्मय घैसास यांनी भूषविले. मान्यवर अभ्यासकांनी या दोन्ही चर्चासत्रांत अभ्यासपूर्ण संशोधन निबंधाचे वाचन केले. एकंदरीत मान्यवरांनी मानवाच्या जीवनातील विज्ञानाचे महत्व त्याअनुषंगाने तयार झालेले साहित्य आणि त्याची उपयुक्तता यावर विस्तृत सांगोपांग चर्चा केली, सहभागी विद्यार्थ्यांचे शंका-समाधान केले या सर्वांचे मी मनस्वी आभारी आहे.

राष्ट्रीय चर्चासत्रानिमित्ताने दाखल झालेल्या मान्यवर समीक्षक, अभ्यासक लेखकांच्या शोधनिबंधांचा हा ग्रंथ आपल्या हाती देताना आनंद होत आहे. दयानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे आधारस्तंभ आदरणीय दिलीपरावजी देशमुख साहेब, दयानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्मानीय अध्यक्ष मा.आ.श्री.धिरज विलासराव देशमुख, सचिव श्री. शाम देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राम वाघ यांचे प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि माझे सहकारी डॉ. दुष्यंत कटारे यांचे या कामी मला मोलाचे सहकार्य मिळाले. महाविद्यालयातील माझे इतर सहकारी व मार्गदर्शकांच्या प्रोत्साहनातून हे संपादित पुस्तक साकार झाले आहे. या सर्वांचे मी कायम ऋणी आहे. कवितेच्या रसिकांना, संशोधकांना व अभ्यासकांना हा ग्रंथ संदर्भग्रंथ होईल, अशी आम्हास खात्री आहे. प्रकाशक व मुद्रक यांचे ही मनस्वी आभार.

**डॉ. जयदेवी पवार**
संपादक, लातूर

## (विभाग - ब) विज्ञान कविता


| अ.क्र | लेखक | लेखांचे नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| १. | प्रा. डॉ. मोना चिमोटे | मराठी विज्ञानकवितेची वाटचाल | १५६ |
| २. | प्रा. डॉ. आबासाहेब सरवदे | कवि आ. य. पवार यांच्या कवितेतील वैज्ञानिक दृष्टिकोन | १६७ |
| ३. | प्रा. डॉ. फुला बागुल | कवि प्रा. आ. य. पवार यांच्या कवितेतील विज्ञानजाणीवा | १७२ |
| ४. | प्रा. डॉ. रमेश पोळ | जाण आणि भान विज्ञानकविता | १७९ |
| ५. | प्रा. डॉ. राजाभाऊ भैलुमे | आ. य. पवारांची विज्ञानकविता | १८४ |
| ६. | प्रा. डॉ. सुनील विभुते | विज्ञानाची दूरदृष्टी असणारा कवि आ. य. पवार | १८८ |
| ७. | प्रा. डॉ. सुभाष देशमुख | वाङ्मयीन गुणवत्तेची विज्ञानकविता | १९५ |
| ८. | प्रा. डॉ. गोपीनाथ बोडखे | विज्ञाननिष्ठ कवि : आ. य. पवार | २०० |
| ९. | प्रा. डॉ. चिन्मय मधु घैसास | नव्वदोत्तरी मराठी कवितेतील आ. य. पवार यांच्या विज्ञानकविता | २०६ |
| १०. | प्रा. डॉ. नवनाथ गोरे | वैज्ञानिक दृष्टीला काव्यानुभव देणारे कवी आ. य. पवार | २१२ |
| ११. | प्रा. डॉ. सुधीर गरड | आ. य. पवारांची 'ऊनपाऊस' मधील विज्ञानकविता | २१७ |
| १२. | प्रा. डॉ. सचिन गिरी | आ.य.पवार यांच्या 'धूळपेर' कवितासंग्रहातील विज्ञान चिंतन | २२२ |
| १३. | प्रा. डॉ. रंजना नेमाडे | आ. य. पवार यांची विज्ञानकविता | २२७ |
| १४. | प्रा. डॉ. जयदेवी पवार | कवि आ. य. पवार यांच्या विज्ञान : कवितेतील भविष्याचा वेध | २३१ |
| १५. | प्रा. डॉ. अनिल बांगर | मराठी साहित्याला सशक्त करणारी प्रा. आ. य. पवारांची विज्ञानकविता | २४० |
| १६. | प्रा. राजकुमार पवार | नव्वदोत्तरी मराठी कवितेतील आ. य. पवारांच्या विज्ञानकविता | २४८ |
| १७. | श्रीमती. कल्पना देवरे | वैज्ञानिक सत्य आणि कवीकल्पना | २५३ |
| १८. | डॉ. विजया राऊत | मराठी कवितेला समृध्द करणारी पवारांची विज्ञानकविता | २५८ |
| १९. | प्रा. भाग्यश्री पाटील | मानवी जीवन शोध : आ. य. पवारांची विज्ञानकविता | २६६ |

# विभाग - ब
# विज्ञान कविता

# 'नव्वदोत्तरी मराठी कवितेतील आ. य. पवार यांच्या निसर्ग आणि विज्ञानकविता'

प्रा. डॉ. चिन्मय मधु घैसास
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग,
गोवा विद्यापीठ, गोवा

**प्रस्तावना :**

विसाव्या शतकाच्या अखेरच्या काळात मराठी साहित्यात ज्या नव्या प्रवाहाचा जन्म झाला तो म्हणजे विज्ञान साहित्य. तसे पाहता त्याआधी या साहित्यप्रवाहांतर्गत बरेच लेखन झालेले दिसते परंतु त्याला एक स्थिर बैठक आणि प्रतिष्ठा प्राप्त झाली ती १९७५ नंतर. एकंदरीतच एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर विज्ञान, तंत्रज्ञानात झालेली प्रगती, त्याचा मानवी जीवनावर झालेला परिणाम तसेच आगामी काळाकडे वेगळ्या नजरेने बघण्याचा मानवी दृष्टिकोन यामुळे विज्ञान साहित्याला फार महत्त्व प्राप्त झालेले आहे. दुसरीकडे विज्ञान कविता हा साहित्यप्रकार याआधीच्या काळात हाताळलेला फारसा दिसत नाही. आ. य. पवार यांच्यासोबत मोजक्याच कवींचे मराठी विज्ञानकाव्य दिसून येते त्यामुळे देखील मराठी विज्ञान-कविता हा प्रकार महत्त्वाचा ठरतो.

कविता हा साहित्यप्रकार जरी परिपूर्ण साहित्यप्रकार म्हणून गणला जात असला तरी तो तितकाच क्लिष्ट आणि निर्मिती करण्यासाठी कठीण आहे. कोणत्याही सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक विषयावर कविता करणे यापेक्षा विज्ञान कविता लिहिणे अधिक आव्हानात्मक असते. विज्ञानातील क्लिष्ट संकल्पना आणि विज्ञानविषयक भविष्यकालीन दृष्टिकोन कवितेसारख्या साहित्य प्रकाराच्या माध्यमातून थोडक्यात मांडणे हेच मुळात खूप धाडसाचे काम आहे. यात दोन वेगवेगळ्या स्तरांवरील आव्हान एकवटलेले आहे. कविता या साहित्यप्रकाराच्या आणि विज्ञान या विषयाच्या आव्हानांचा एकत्रित मेळ बसवून ही निर्मिती करावी लागत असते. कविता निर्माण करीत असताना यमक, अनुप्रास, उपमा यांसारख्या अलंकारांचा तसेच वृत्त, छंद, लयबद्धता यांचा सुयोग्य वापर करणे हेही फार आवश्यक असते.

गद्य स्वरुपात विज्ञान-साहित्य लेखन करताना विस्तृत वर्णन करणे शक्य असते. काव्याच्या बाबतीत संभवणारी आव्हाने गद्यात लेखकाला भेडसावत नसतात परंतु काव्यात 'गागर में सागर' या न्यायाने सर्व काही व्यक्त करण्याची कल्पकता कवीजवळ असावी लागते. आ. य. पवार यांचे काव्य पाहिल्यावर, यांच्याजवळ ही कल्पकता असल्याचे स्पष्टपणे जाणवते.

निसर्ग कविता आणि विज्ञान कविता असे दोन्ही प्रकारचे लेखन त्यांनी केलेले असल्याने याचा फार सुंदर परिणाम त्यांच्या विज्ञान कवितेवर झालेला दिसून येतो. निसर्ग हाच विज्ञानाचा स्रोत आणि सर्वात मोठी प्रेरणा आहे आणि त्यामुळे निसर्गाचे वर्णन, चित्रण करताना विज्ञानकाव्यही तेवढ्याच समर्थपणे आणि ताकदीने त्यांनी मांडले आहे.

विज्ञान साहित्यात भविष्याचे चित्रण अतिशय महत्त्वाचे असते. मानवाने आजवर केलेल्या विज्ञान प्रगतीच्या आणि प्रवासाच्या आधाराने आगामी काळातील परिस्थिती कशी असेल याचे चित्रण विज्ञान साहित्यात यावे लागते. विज्ञान शिक्षण हा विज्ञान साहित्याचा हेतू नसतो तर विज्ञानाच्या भविष्यकाळातील रुपाचा अंदाज बांधणे आणि त्याद्वारे समाजप्रबोधन आणि जागृती करणे हाही उद्देश यामागे असावा लागतो. या सर्व निकषांवर आ. य. पवार यांची कविता सार्थ ठरलेली दिसते. 'द्विदल' या त्यांच्या कवितासंग्रहातील कविता भविष्यातील विज्ञानाकडे लक्ष वेधणाऱ्या आहेतच; परंतु त्याचबरोबर मानवाला त्याच्या सद्य काळातील वाटचालीवरुन भविष्यातील आव्हानांसाठी सतर्कदेखील करणाऱ्या आहेत.

## 'द्विदल' या संपादित ग्रंथातील आ. य. पवार यांच्या विज्ञान कविता

'चिंता' या कवितेत, मानवी जीवनाला विज्ञानामुळे लाभलेली गतिमानता आणि पृथ्वीपासून अवकाशापर्यंत मानवाने गाठलेली मजल यांचे शब्दचित्र कवी रेखाटतात. माणसाने एवढी उंची गाठली असली तरी देखील मानवाच्या अंतरंगात अजुनही दुःखाचे डोंगर शिल्लक आहेत याची जाणीव ही कविता करुन देते. मानवाने अवकाशाचा शोध घेतला पण स्वतःच्या अंतरंगाचा शोध घेण्याची बुद्धी आणि गरज त्याला कधीच झाली नाही या भयाण वास्तवाकडे ही कविता वाचकांचे लक्ष वेधून घेते. विज्ञानाच्या अतिरेकामुळे माणूस दहशतवादी बनत चालला आहे आणि या दहशतरुपी रावणामुळे मानवाचे एकुण भविष्य अंधकारमय, अनिश्चित झाले आहे याची भीती ही कविता व्यक्त करते.

मानवाने साध्य केलेल्या विज्ञान-प्रगतीचा आनंद, उत्साह 'विज्ञानयुग' या कवितेतून कवी व्यक्त करतात. मात्र त्याच वेळी विज्ञानाच्या मदतीने मानवाने करू घातलेल्या नव्या शोधांचा, बदलांचा वेधही ही कविता घेते. मानवी क्लोन तयार करणे, देवकणाचा शोध घेणे यांसारख्या अद्वितीय चमत्कारांना मानवाने साकार केले असले तरी माणूस केवळ विज्ञानामागे धावत आहे आणि देवाचे नाव घ्यायला त्याच्याकडे उसंतदेखील नाही याचेही भान ही कविता करून देऊ पाहते. मानवाने अशा चमत्कारांना साकार केले असले तरी मानवापेक्षाही मोठी, या सृष्टीचे संचलन करणारी एक अज्ञात शक्ती कोठे तरी आहे याचे भान मानवाने ठेवले पाहिजे याकडे ही कविता लक्ष वेधते. माणूस, निसर्ग, विज्ञान या सर्वांना चालविणारी ही जी फार मोठी शक्ती आहे तिच्या किमान स्मरणाद्वारे मानवाने तिच्याविषयीची कृतज्ञता मनात जपावी ही कवीची कळकळ आहे. अनंत आणि गूढ अशा अंतराळाचा आपल्या कवटीच्या आधाराने वेध घेण्याचा

मानवाचा प्रयत्न कवीला हास्यास्पद वाटतो. ब्रह्मांडाच्या व्याप्तीचा विचार करता मानवाचे अस्तित्व किती क्षुल्लक आहे याचीही आठवण ही कविता करुन देते.

काळानुरूप झालेले बदल आणि त्यामुळे जुनी संस्कृती, जुनेपण हरवल्याची खंत 'बदल' या कवितेत व्यक्त होते. अणुऊर्जेचा शोध आणि वापर सकारात्मक कार्यासाठी करण्याची अपेक्षा कवी व्यक्त करतात. अणुशक्तीच्या गैरवापरामुळे एकूणच निसर्गाला संभवणारा धोका आणि जीवनाच्या अंताची भीतीही व्यक्त होते.

'पाणीदार चंद्र' कवितेतून हवामान बदलाचा वेध तसेच भविष्यातील जलयुद्धाचे संकट आणि त्याची चाहूल दिसते. मानवासमोर उभ्या असलेल्या पाणीप्रश्नावर ही कविता नेमकेपणाने बोट ठेवते. पृथ्वीवरील पाण्याच्या संदर्भात चंद्राचे महत्व, भरती-ओहोटीत चंद्राचे योगदान हे मुद्दे अधोरेखित करताना, पाणी असेल तरच जीवन टिकेल ही जाणीवही प्रकर्षाने कवी करून देऊ इच्छितात.

भोगवादी संस्कृती आणि त्यात होत जाणारी वाढ यांचे दर्शन 'करणी' कवितेतून घडते. झटपट आयुष्यासाठी मानवाने विज्ञान-तंत्रज्ञानाचा घेतलेला आधार आणि त्याचे पृथ्वीवर झालेले भयानक परिणाम यातून पृथ्वीची झालेली दयनीय अवस्था यांचे शब्दचित्र कवीने रेखाटले आहे. पृथ्वीचे आशाळभूतपणे पाहणे, पणती विझणे यासारख्या प्रतिमांच्या वापरामुळे काव्य अधिकच प्रभावी झालेले दिसते.

'विज्ञान वंदना' कवितेत तंत्रज्ञानाने आजवर केलेली आणि भविष्यातील आश्वासक प्रगती यांचा वेध घेतानाच माणसाच्या जीवनमानात झालेला क्रांतिकारी बदल, माहिती-तंत्रज्ञानात झालेला आमूलाग्र बदल, परग्रहांवरील निवासाची वास्तवदर्शी दिवास्वप्ने, परग्रहनिवासींच्या शोधासाठी मानवाने केलेले प्रयत्न, दळणवळणातील सुधारणा, गुंतगुंतीची प्रक्रिया करणारी उपकरणे, यंत्रे यांची माहिती कवी करून देतात. मात्र हे सर्व होत असतानाच पृथ्वीवरील मूलभूत तत्त्वांचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होतोय हेही प्रस्तुत कविता अधोरेखित करते.

'रूपांतर' कवितेच्या माध्यमातून अर्धनारीनटेश्वर रूपाचे वर्णन कवीने केले आहे. बाईच्या शरीरातूनच एका पुरुषाचा जन्म होतो. या मुद्यावर बोट ठेवताना प्रत्येक पुरुषाच्या आत एक बाई आणि प्रत्येक बाईच्या आत एक पुरुष असतो ही बाब ध्यानी आणून देत लिंगसमानतेकडेही आवर्जून लक्ष देण्याची गरज ही कविता व्यक्त करते. ज्याप्रमाणे अणुरेणू एक होउन चमत्कार घडवितात त्याचप्रमाणे स्त्री आणि पुरुष यांची एकरूपता सृष्टीसाठी तेवढीच महत्त्वाची आहे याकडे ही कविता लक्ष वेधून घेते.

विश्वाच्या, ब्रह्मांडाचा बाजार मांडल्याचे आणि यच्चयावत प्रत्येक गोष्टीची जी विक्री मानवाने सुरु केली आहे त्याचा खरपूस समाचार 'अनोखी खरेदी' ही कविता घेते. माणूस स्वत: ज्या निसर्गाच्या चमत्काराचे सगुण साकार रुप आहे, ज्या निसर्गाने मानवाला अस्तित्वात आणले

आहे त्याच निसर्गाची खरेदी-विक्री करणारे आपण कोण? असा खडा सवाल ही कविता उपस्थित करते. मानवी व्यवहारातील देवाणघेवाण आणि खरेदी-व्यवहारात झालेले तंत्रज्ञानात्मक बदल, चलनाच्या रूपात आलेली स्थित्यंतरे यांचाही परामर्श ही कविता घेते. प्रत्यक्ष चलन ते अप्रत्यक्ष चलन ते आभासी चलन अशा या प्रवासाचे भावी काळात किती वेगळे रुप पाहवयास मिळेल याचीही कल्पना यानिमित्ताने वाचकांच्या मनात ही कविता निर्माण करते. या अनंत ब्रह्मांडात मानवाचे अस्तित्व मुळातच नगण्य आहे तरीही माणूस ब्रह्मांडावर आपल्या स्वामित्वाचा टेंभा मिरवितो याकडे ही कविता लक्ष वेधते. भविष्यात आंतरग्रहीय खरेदी-व्यवहार-देवाणघेवाण झाल्यास त्याचे रूप काय असेल याविषयीची कल्पना ही कविता वाचकांना करायला लावते.

मंगळावर वस्ती करण्याचे मानवी प्रयत्न, विविध शोध, संशोधने याविषयीचे भाष्य 'मंगळवस्ती' कवितेतून आलेले आहे. कृत्रिम वातावरण तयार करण्याचे प्रयत्न आणि त्यातून निर्माण होणारे संभाव्य धोके यांचे वर्णन करताना कवीने, आजवर मानवाला कृत्रिम गोष्टी तयार करण्याच्या प्रयत्नांत आलेल्या कटू अनुभवांचा संदर्भ घेतला आहे. मंगळासारख्या परग्रहाचा वापर भविष्यात यदाकदाचित पर्यटनासाठी केला जाईल आणि त्यासाठी अल्पावधीतच तिथपर्यंत प्रवास करू शकणारी याने मानवाद्वारे तयार केली जातील अशी कल्पना कवीने केलेली आहे. भविष्याचा वेध घेणे या तत्त्वांच्या अनुषंगाने कवीची ही कल्पना विज्ञानसाहित्य या संकल्पनेला पूरक आणि दिशादर्शक आहे.

'अपेक्षा' या कवितेतून भविष्यातील एका आदर्श काळाची कल्पना कवीने केलेली आहे. जगातील वाईट ते सर्व काही नष्ट करण्याची शक्ती/क्षमता असलेले एक यंत्र निर्माण व्हावे ही कल्पना करताना मानवी स्वभावातील खलवृत्ती, दुष्टता, कटुता, रोगराई या सर्वांचा नाश होऊन सर्व काही सर्वांगसुंदर होवो ही कल्पना कवी करतात. 'जे खळांची व्यंकटी सांडो' असे म्हणत पसायदानातून ज्ञानदेवांनी व्यक्त केलेली भावना कृत्रिमरीत्या एखाद्या यंत्राच्या मदतीने मानव भविष्यात साध्य करेल, अशी कल्पना कवी या कवितेत करतात. भविष्यात मानवी जीवन अद्वितीय, नितान्तसुंदर, निकोप आणि आदर्श असेल असे स्वप्न कवी पाहतात.

पृथ्वीची निर्मिती, पृथ्वीचे सूर्याभोवती फिरणे, निसर्गचक्र, ऋतुमान आणि त्यांचे सौंदर्य तसेच विविध जिवांची निर्मिती या सर्वांचा आनंद कवीने 'उत्क्रांती' या कवितेत व्यक्त केला आहे. मात्र असे असले तरी मानवाने मात्र या सर्वांच्या पल्याड जाऊन स्वतःचे वेगळे जग तयार केलेले आहे. या जगात धर्मांची, जातीपातीची भांडणे कलह निर्माण करतात आणि या सर्वांतून मानवी जीवनाचेच नुकसान कसे होते याकडे माणसांनी लक्ष देण्याची आवश्यकता कवीला वाटते. वास्तव भयाण असले तरी पुन्हा एकदा सर्व काही सुंदर होण्याची अपेक्षा करायला कवी विसरत नाहीत हे विशेष.

'विश्वाचे नवल' या कवितेतून विश्वाच्या गूढतेचे आणि अनाकलनीयतेचे आश्चर्य कवी व्यक्त करतात. या अथांग ब्रह्मांडाचे चलन व नियंत्रण नक्की कोण करते? या प्रश्नाचा शोध

कवी घेतात. या चराचर विश्वाची निर्मिती कशी झाली यासंबंधी आजवर अनेक तर्क आणि सिद्धान्त मांडले गेले आहेत. त्याचाच पुढचा वेध घेण्याचा प्रयत्न कवी करतात. मात्र याच्याही एक पाऊल पुढे जाऊन ज्यावेळी हा सर्व प्रवास ज्या क्षणी उलट दिशेने होऊ लागेल त्यावेळी काय होईल याची चिंता कवी करतात. प्रलयाची ती नांदी असेल का याचाही विचार ही कविता वाचकाला करायला लावते.

मानवाचे युद्धपिपासूपण आणि युद्धाचे मानवी जीवनावरील दुष्परिणाम यांचा वेध 'उदय' या कवितेत कवीने घेतला आहे. 'रहस्य' कवितेतून बिग बँग आणि विश्वाची निर्मिती यांचा विचार करतानाच रोज दिसणारी विज्ञानाची नित्यनूतन रुपे कवीच्या चिंतनाचा भाग बनतात. मानवाने तथाकथित कितीही प्रगती केली तरी विज्ञान दर वेळी माणसासमोर नवनवीन प्रश्न ठेवते हा मुद्दा कवीला महत्त्वाचा वाटतो. विज्ञान नावाच्या खेळातील आपण एक प्यादे आहोत याची जाणीव मानवाला व्हावी ही भूमिका प्रामुख्याने या कवितेतून कवीने घेतली आहे.

परग्रहाचा आणि परग्रहवासींचा शोध घेण्याची माणसाची धडपड आणि त्यातून अनंत काळच्या प्रवासाचा प्रयत्न मानवाने केलेला आहे. याच प्रयत्नाचे चित्रण 'व्हायेंजर' कवितेत दिसून येते. मानवाचा हा अनंत प्रवास अनिश्चित स्वरूपाचा असला तरी माणसाचे प्रयत्न निश्चित आहेत. या प्रयत्नात मानवाने बरीच माहिती गोळा करताना, ब्रह्मांडाच्या अथांग व्यापात पृथ्वी हा नुसता एक ठिपका आहे आणि हीच या पृथ्वीची ओळख आहे ही जाणीव प्रत्येकाने ठेवण्याची गरज कवीला वाटते. आपण नुसता एक ठिपका असलो तरी या अथांगाचा धांडोळा घेण्याची मानवाची जिद्द कवीला वाखाणण्यासारखी वाटते. भविष्यात मानवसदृश जीव आपल्याला सामोरे आलेच तर ते आपल्याला जवळ घेतील की आपल्याशी युद्ध करतील याची भीती कवीच्या मनाला स्पर्शून जाताना दिसते. पृथ्वीवर आपण एकमेकांशी त्वेषाने भांडतो, युद्ध करतो मात्र त्याच वेळी बाह्य अवकाशातील नव्या जिवांचा शोधही आपण घेतो हा विरोधाभास कवीला चक्रावून सोडणारा आहे. सध्या माणूस एकमेकांविरूद्ध ज्या पद्धतीने वागतो आहे ते पाहता भविष्यात यदाकदाचित माणसाचा संदेश बाह्य जिवांना सापडलाच आणि ते पृथ्वीवर आलेच तर तोपर्यंत इथे माणूस जिवंत असेल का याचीही चिंता कवीला वाटते.

महाकाय आकाराच्या कृष्णविवराचा विचार 'राक्षस' या कवितेत करताना कवी कृष्णविवराची तुलना राक्षसाशी करतात. आजवर केली गेलेली राक्षस ही संकल्पना म्हणजेच कृष्णविवराचाच संदर्भ होता का? असाही एक वेगळा विचार या निमित्ताने ही कविता करायला लावते. कृष्णविवराचे गूढ आणि त्याविषयीचे अज्ञान 'फरक' या कवितेत कवीने मांडले आहे. *ताऱ्यांचा जन्म आणि मृत्यू ही कायम घडणारी घटना*. तारे आणि नक्षत्रे यांचा अंश म्हणजे मानवी जीवन असे म्हणताना या जीवनाची परतफेड म्हणून मानवाने प्रेम द्यावे आणि मानवी जीवन लाभल्याची उधारी पुरी करावी असे कवी 'उधारी' कवितेत म्हणतात. पाण्याचे महत्त्व आणि जीवनासाठी पाण्याची नितान्त आवश्यकता 'जळ' कवितेतून कवी व्यक्त करतात. सभोवताली

खारट पाण्याचा अथांग समुद्र असला तरी त्याचा जीवनासाठी काहीही उपयोग नसतो हे अधोरेखित करताना जलसंवर्धनाचा सल्लाही कवी देतात.

'बर्म्युडा ट्रँगल' या अद्‌भुत आणि अनाकलनीय ठिकाणाचा उल्लेख करताना त्याकडे अलीकडच्या काळात एका वेगळ्या दृष्टीने पाहण्याचा झालेला विचारही कवीच्या वर्णनातून पुन्हा एकदा समोर येतो. बर्म्युडा ट्रँगल म्हणजे एखाद्या परग्रहावर जाण्याचा छुपा मार्ग तर नव्हे, अशी दाट शंका आज अनेक वैज्ञानिक व्यक्त करतात. 'तोल' कवितेतून मानवी जीवनाच्या सुरक्षिततेसाठी आपण सर्वार्थाने सर्व गोष्टींचा तोल राखण्याची गरज कवी व्यक्त करतात. सर्व प्रकारची संकटे सोसून कललेल्या आसातून पृथ्वी मानवी जीवनाचे रक्षण करते याची जाणीव ठेवून आपणही त्याच पद्धतीने वागले पाहिजे हा संदेश कवी या कवितेतून देऊ पाहतात.

अखेरीस, 'गुणसूत्र' या कवितेतून डीनए सिद्धान्त आणि मानव जन्माचे रहस्य कवी वर्णन करतात. 'खेळ' या कवितेच्या माध्यमातून ब्रम्हांडात होणारी स्फोट आणि आकुंचनाची व प्रसरणाची निरंतर प्रक्रिया कवी सांगतात. ब्रह्मांडातून उल्का पडणे आणि त्याआधारे पाणी निर्माण होऊन जीवनपूरक परिस्थितीची निर्मिती कशी झाली याचा विचार 'उल्का' या कवितेत कवीने केलेला आहे.

**समारोप :**

आपल्या विज्ञान-कवितेतून विज्ञानाच्या वेगवेगळ्या मुद्यांची आणि पैलूंची माहिती देणे आणि प्रबोधन करणे हा हेतू आ. य. पवार प्रामुख्याने बाळगताना दिसतात. मात्र त्याद्वारे सद्य काळातील आणि भविष्यातील परिस्थितीची चाहूल करून देणे आणि समाजभान निर्माण करणे हाही मोठा उद्देश त्यांच्या विज्ञान-काव्यलेखनामागे आहे. वास्तवाचे चित्रण करताना त्यांची कविता भविष्यातील संभाव्य प्रश्नांवर भाष्य करते. शब्दसंख्या आणि आशय या दोन्ही पातळींवर त्यांची कविता उण्याअधिक लांबीरुंदीची असलेली दिसून येते. दीर्घ वर्णनाबरोबरच चारोळीसारख्या आकृतिबंधातूनही त्यांनी आपले विज्ञान-विचार मांडले आहेत. मानवाच्या फाजील आत्मविश्वासावर आणि निसर्गाच्या असामान्यतेवर भाष्य करणारी त्यांची कविता आहे. मानवी वृत्तीवर त्यांची कविता खरमरीत टीका करते. विज्ञानाच्या विविध संकल्पनांची यथार्थ माहिती आपल्या कवितेतून आ. य. पवार करून देतात. त्यांच्या कवितेत वास्तवाची गंभीर भीती आहेच परंतु भविष्यकाळाविषयीचा तेवढाच समर्थ आशावादही दिसून येतो हे विशेष.

**संदर्भ :**

१. द्विदल - आ. य. पवारांच्या निसर्ग व विज्ञान कविता (संपादक) डॉ. वंदना लव्हाळे, यशोदिप पब्लिकेशन्स, पुणे (२०१८)

विज्ञानाच्या प्रगतीमुळे जगात सध्या प्रचंड मोठ्या गतीने बदल घडत आहेत. या बदलाचे चित्रण मराठी साहित्यात उतरल्यास नव्या पिढ्यांसाठी ती माहिती दिशादर्शक ठरणार असल्याचा सूर "नव्वदोत्तरी मराठी कवितेतील आ. य. पवार यांच्या निसर्ग व विज्ञानकविता" या विषयावर एकदिवसीय आभासी राष्ट्रीय चर्चासत्रातून उमटला आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून कथा-कवितांमधून रंगविलेली कल्पनाचित्रे प्रत्यक्षात उतरविण्यासाठी शास्त्रज्ञ मंडळी प्रयत्नशील असतात. त्यामुळे वास्तव आणि काल्पनिक गोष्टींचा मेळ घालून तयार झालेले वैज्ञानिक साहित्य समाजासाठी उपयोगी ठरत असल्याचे अनेक वक्त्यांनी या चर्चासत्रात सोदाहरण पटवून दिले. दरम्यान वैज्ञानिक संकल्पनेतून लिहिल्या गेलेल्या साहित्याची प्रेरणा घेऊन अनेक नवलेखक आपली लेखनशैली विकसित करतील, अशी अपेक्षाही चर्चेदरम्यान व्यक्त झाली. बहुतांश वैज्ञानिक संशोधन इंग्रजी भाषेत असल्यामुळे ते ज्ञान मराठीत आणण्यासाठी, आवश्यक असणारे मराठी शब्दभांडार वाढवून मराठी साहित्याच्या अभ्यासाला नवी दिशा देण्याच्या दृष्टीने या चर्चासत्राचा उपयोग होईल ही अपेक्षा आहे. या अपेक्षापूर्तीसाठीचा एक प्रयत्न म्हणून चर्चासत्राच्या अनुषंगाने आलेले शोधनिबंध संपादित करुन पुस्तक रुपाने प्रकाशित करण्याचा संकल्प करण्यात आला. तो संकल्प आज पूर्णत्वास जातो आहे. याचा मला मन:स्वी आनंद आहे. महाविद्यालयातील माझे सर्व सहकारी व मार्गदर्शकांच्या प्रोत्साहनातून हे संपादित पुस्तक साकार झाले आहे. मराठी विषयाचे अभ्यासक, संशोधक, प्राध्यापक तसेच विद्यार्थी यांना हे पुस्तक संदर्भग्रंथ म्हणून उपयुक्त ठरेल, असा माझा विश्वास आहे.




**प्रा.डॉ. जयदेवी पवार**

विभाग प्रमुख - मराठी विभाग

कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव


किंमत - 425/